# उत्कंठा

## ‘आनंदमय जन्मदिवस’ याप्रीत्यर्थ
## गुरुमाई चिद्विलासानंद यांनी निवडलेला एक सद्‌गुण

### सिद्धयोग ध्यानशिक्षक मैत्रेय लॅरिओस यांच्याद्वारे लिखित भाष्य

ज्या दिव्य सद्‌गुणांचा विकास करण्यासाठी श्रीगुरुमाई आपल्याला प्रोत्साहित करतात त्या सद्‌गुणांविषयी एक विशेष गोष्ट ही आहे की, ते सद्‌गुण आपल्या अंतरी आधीपासूनच विद्यमान आहेत. उदाहरणार्थ, उत्कंठा हाच सद्‌गुण घ्या. चिरस्थायी सुख आणि खरा संबंध प्राप्त करण्याची उत्कंठा या ग्रहावरील प्रत्येकामध्ये आहे आणि आपला प्रत्येक निर्णय, प्रत्येक कार्य या उत्कंठेवरच आधारलेले असते. ही उत्कंठा बऱ्याचदा आपल्या सर्व प्रकारच्या इच्छांमधून व्यक्त होते; या विश्वासासह की, आपल्या बाह्य परिस्थिती आणि मालमत्ता आपल्याला सुखी करतील : एक नवीन गाडी, अधिक प्रेमळ जीवनसाथी, उच्च पदे, किंवा अधिक रमणीय स्थळांच्या सहली. परंतु, खरे पाहता अशी उद्दिष्टे अल्पकालीन असतात आणि आपल्याला खराखुरा आनंद देण्याऐवजी, एकदा का त्यांची पूर्तता झाली, की मग त्यांच्या जागी नव्या इच्छा जागृत होतात. या चक्रामध्ये आपली भूक पूर्णपणे कधीही भागत नाही; आपण आपल्या खऱ्या उत्कंठेला जाणूच शकत नाही आणि ती अपूर्णच राहाते.

श्रीगुरुमाई उत्कंठेची व्याख्या या शब्दांत करतात :

> उत्कंठा ही आहे : अंतरीचा तो प्रकाश पाहण्याची इच्छा, आंतरिक अनुभव घेण्याची इच्छा, ईश्वराच्या दर्शनाची इच्छा, सत्याच्या अनुभूतीची इच्छा.[१]

श्रीगुरुमाई आपल्याला शिकवतात की, उत्कंठेचे गहनतम स्वरूप आहे, आपल्या अंतरी निहित असलेले सत्य जाणण्याची इच्छा. संस्कृत भाषेमध्ये ‘उत्कंठा’ या शब्दासाठी अनेक शब्द आहेत. पारंपरिक दृष्ट्या मोक्षप्राप्तीच्या लालसेला ‘मुमुक्षुत्व’ म्हटले जाते म्हणजेच ‘मोक्षासाठी अर्थात परम मुक्तीसाठी असलेल्या तीव्र इच्छेची स्थिती’. ही संस्कृत संज्ञा मूळ क्रियापद ‘मुक्’ पासून येते, ज्याचा अर्थ आहे, ‘सोडून देणे’, ‘स्वतंत्र करणे’, ‘मुक्त करणे’. कशापासून मुक्त करणे? महान भारतीय ऋषी आदि श्रीशंकराचार्य ‘विवेकचूडामणि’ या आपल्या ग्रंथामध्ये, मुमुक्षुत्वाच्या व्याख्येद्वारे याविषयी संकेत देतात, ते म्हणतात :

> अहंकारादिदेहान्तान् बन्धानज्ञानकल्पितान्।
> स्वस्वरूपावबोधेन मोक्तुमिच्छा मुमुक्षुता॥
>
> स्वस्वरूपाला जाणून घेण्याद्वारे स्वतःला समस्त बंधनांतून मुक्त करण्याची इच्छा म्हणजे मुमुक्षुत्व होय. अहंकारापासून ते भौतिक देहालादेखील बद्ध करणारे ही बंधने, अज्ञानाविषयी असलेल्या [मनुष्याच्या] आसक्तीमुळे उत्पन्न होतात.[२]

"स्वतःला समस्त बंधनांतून मुक्त करणे," या शब्दांतून श्रीशंकराचार्य असे म्हणत नाहीत की, आपण आपल्या शरीराचा किंवा मनाचा किंवा आपल्या पदांचा वा ऐहिक उद्यमांचा त्याग करावा, तर त्यांना हे अभिप्रेत आहे की, या सर्व गोष्टी म्हणजे आपल्या सीमित व्यक्तित्वाचे अर्थात जीवभावाचे पैलू आहेत आणि यांच्याशी निगडित असलेली स्वतःविषयीची आपली जी भ्रमयुक्त ओळख आहे, तिच्यापासून आपण स्वतःला मुक्त केले पाहिजे. तेव्हा, आपल्या खऱ्या स्वरूपाविषयीच्या अज्ञानातून मुक्त होणे म्हणजे मोक्ष होय. ही ती स्थिती आहे ज्यात आपण आपल्या खऱ्या आत्म्याचे स्वातंत्र्य आणि आनंद यांविषयीचा आपला बोध पुन्हा पूर्णपणे प्राप्त करतो. आणि उत्कंठा ही एक प्रकारचे पोषण आहे जिची आपल्याला आवश्यकता यासाठी असते की, तिच्याद्वारे आपण आपले अंगभूत स्वातंत्र्य अनुभवण्याच्या यात्रेत विकास आणि प्रगती करू शकू.

महान ऋषिगण आपल्याला सांगतात की, एकदा आपण आपल्या बोधाला अंतरी वळवले आणि आपल्या आनंदाच्या स्रोताला शोधून काढले की, मग आपल्याला हे ज्ञात होते की, ज्याचा शोध आपण घेत आहोत ते वास्तवात आपल्याच अंतरी विद्यमान आहे.

## उत्कंठेसाठी अभिकथन

मला हे अभिज्ञान आहे की, भगवंताला जाणण्याची इच्छा
हीच माझ्या उत्कंठेचे सार आहे.

*[अभिज्ञान होणे अर्थात ओळखणे, बोध होणे, जाणून घेणे, ज्ञात होणे]*

*[अभिकथन—ते कथन ज्याचे जागरूकतेसह वारंवार उच्चारण केले जाते, जेणेकरून ते आपल्या चेतनेत स्थिरावेल.]*

[1] गुरुमाई चिद्विलासानंद, *Kindle My Heart* [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क, एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९९६] पृ. २०४.

[2] विवेकचूडामणि, २७; इंग्रजी भाषांतर © एस. वाय. डी. ए. फाउंडेशन २०१६.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.